**MHST**050003222006

<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ३०/२००६ मधील</u>
<u>निशाणी क्रमांक ३३८ खालील आदेश.</u>

(जयवंत देसाई विरुध्द महाराष्ट्र सरकार)

(०१). यातील वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र.११ यांनी निशाणी २३१ येथे दिलेला तोंडी पुरावा 'खारीज (Discard) करावा/पुराव्यात वाचु नये' या करिता दिला आहे. वादी यांचे कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.११ यांनी स्वत: करिता आणी प्रतिवादी क्र.०३ ते ०७ यांचे करिता निशाणी २३१ येथे तोंडी पुराव्याचे शपथपत्र दाखल केले होते. त्यांचा अंशत: उलट तपास वादीतर्फे झाला होता. तद्नंतर ते उलट तपासा करिता हजर न राहीलेमुळे न्यायालयाने निशाणी ०१ वर दिनांक १४/०३/२०२४ रोजी 'प्रतिवादी क्र.११ हे त्यांच्या उलट तपासासाठी अनेक तारखांपासुन गैरहजर. सबब प्रतिवादींनी उलट तपासासाठी हजर रहावे अन्यथा त्यांचा पुरावा खारीज (Discard) करण्यात येईल' असा आदेश केला होता. तद्नंतर देखील प्रतिवादी क्र.११ हे उलटतपासा करिता हजर राहीले नाहीत सबब दिनांक ०८/०७/२०२४ रोजी प्रतिवादींचा पुरावा बंद करणेत आला आहे. प्रतिवादींचे विद्वान वकीलांनी त्यांच्या अंतिम युक्तीवादात 'प्रतिवादींचा पुरावा बंद झाला आहे, तो खारीज करणेत आलेला नाही' असे कथन केले आहे. सबब

प्रतिवादीच्या पुराव्या बाबत साशंकता राहु नये म्हणुन वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

**(०२).** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणने दाखल करुन वादींच्या अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. त्यांचे कथन असे आहे की, दावा वीस वर्ष जुना आहे. प्रश्नाधीन आदेश दिनांक ०८/०७/२०२४ रोजी पारीत करणेत आला आहे. त्यास ही जवळपास ०१ वर्ष आणी ०७ महिन्याचा कालावधी झाला आहे. निशाणी २३१ वरील पुराव्यावर कसलाही आदेश झालेला नाही. वादींनी दिनांक ०८/०७/२०२४ रोजीच्या निशाणी ०१ वरील आदेशा बाबत आतापर्यंत तक्रार केलेली नव्हती. आता या कामी प्रतिवादींचा अंतिम युक्तीवाद झाला आहे. सबब वादीचा हा अर्ज मुलत:च बेकायदेशीर नसलेमुळे खर्चासह रद्द करणेत यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**(०३).** अर्ज, दावा, सोबत दाखल कागदपत्रे यांचे, तसेच प्रतिवादी यांचे या अर्जास दाखल म्हणने याचे वाचन केले. दोन्ही बाजुच्या विद्वान वकीलांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला. निशाणी २२३ येथील प्रतिवादी क्र.११ चे तोंडी पुराव्याचे शपथपत्र पाहीले असता त्यावर दिनांक २०/०६/२०१९ रोजी '**न्यायालयीन कामकाजाची वेळ संपलेमुळे उलटतपास तहकुब**' असा आदेश झाला असल्याचे दिसुन येते. म्हणजेच प्रतिवादी क्र.११ चा उलट तपास दिनांक २०/०६/२०१९ रोजी 'अर्धवट राहीला आहे/पुर्ण झाला नाही' असे दिसुन येते. तसेच माझे सन्माननीय पुर्वाधिकारी यांचा निशाणी ०१ वरील दिनांक १४/०३/२०२४ रोजीचा आदेश पाहिला असता तेथे '<u>प्र. वादी क्र.११ हे</u>

उलट तपासासाठी अनेक तारखांपासुन गैरहजर. सबब प्र. वादी क्र.११ हे त्यांच्या उलट तपासासाठी हजर रहावे अन्यथा त्यांचा पुरावा खारीज (Discard) करणेज येईल' असा आदेश झाल्याचे दिसुन येते. तसेच माझे सन्माननीय पुर्वाधिकारी यांचा निशाणी ०१ वरील दिनांक ०८/०७/२०२४ रोजीचा आदेश पाहिला असता तेथे 'प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.११ श्री महादेव देसाई यांनी प्रतिवादी क्र.०३ ते ०७ साठी आणी स्वत:साठी निशाणी क्र.२३१ कडे दिनांक १२/१०/२०१८ रोजी सरतपासणीचे शपथपत्र दाखल केले आहे. त्या नंतर वादीतर्फे प्रतिवादी क्र.११ याचा अंशत: उलट तपास झालेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण आज रोजी प्रतिवादी क्र.११ महादेव देसाई यांच्या उर्वरित उलटतपासासाठी निश्चीत केले आहे. प्रतिवादी क्र.११ चा उलटतपास घेणेसाठी वादीचे विद्वान वकील श्री. ए. एस. काळे हे आज न्यायालयात हजर आहेत. प्रतिवादी क्र.११ श्री महादेव देसाई यांना व त्यांच्या विद्वान वकीलांना उर्वरित उलटतपासाकरिता दुपारी ०१.०० वाजता वारंवार पुकारले असता गैरहजर आहेत. प्रतिवादी क्र.११ यांनी उर्वरित उलटतपासासाठी त्यांची उपस्थिती राखली नाही. सबब प्रतिवादी क्र.०३ ते ०७ व ११ यांचा पुरावा बंद करण्यात येतो.' असा आदेश झाल्याचे दिसुन येते.

**(०४).** कबुल तथ्यानुसार निशाणी २२३ येथील प्रतिवादी क्र.११ चे तोंडी पुराव्याचे शपथपत्र पाहीले असता त्यावर दिनांक २०/०६/२०१९ रोजी 'न्यायालयीन कामकाजाची वेळ संपलेमुळे उलटतपास तहकुब' असा आदेश झाला असल्याचे दिसुन येते. म्हणजेच प्रतिवादी क्र.११ चा उलटतपास दिनांक

२०/०६/२०१९ रोजी 'अर्धवट राहीला आहे/पुर्ण झाला नाही' असे दिसुन येते. तसेच माझे सन्माननीय पुर्वाधिकारी यांचा निशाणी ०१ वरील दिनांक १४/०३/२०२४ रोजीचा आदेश पाहिला असता तेथे 'प्र. वादी क्र.११ हे उलट तपासासाठी अनेक तारखांपासुन गैरहजर. सबब प्र. वादी क्र.११ हे त्यांच्या उलट तपासासाठी हजर रहावे अन्यथा त्यांचा पुरावा खारीज (Discard) करणेज येईल' असा आदेश झाला असला तरी निशाणी ०१ वरील दिनांक ०८/०७/२०२४ रोजीच्या आदेशाने पुर्वी आदेशीत केले प्रमाणे 'पुरावा खारीज न करता, तो बंद केला आहे' ही वस्तुस्थिती आहे. काही असले तरी दिनांक ०८/०७/२०२४ रोजी पर्यंत प्रतिवादी क्र.११ हे त्यांचे उलटतपासा करिता गैरहजर होते ही वस्तुस्थिती आहे व ती दुलक्षित करता येणारी नाही. ते हजर असते तर त्यांचा उलट तपास पुर्ण झाला असता आणी ते हजर असताना वादींनी त्यांचा उलट तपास घेतला नसता, तर वादीचे विरुध्द 'उलटतपास नाही' असा आदेश झाला असता. याचाच अर्थ आता या कामी दाव्याचे अंतिम समयी जी परिस्थिती उद्भवली आहे ती केवळ प्रतिवादी क्र.११ हे दाव्याचे कामी हजरच राहीले नसल्यामुळे निर्माण झाली आहे. दाव्यातील कोणत्याही पक्षकाराचा किंवा त्यांचे तर्फे साक्षीदाराचा उलटतपास पुर्ण झालेशिवाय म्हणजेच त्याच्या सरतपासातील तथ्ये ही विरुध्द बाजुने घेतलेल्या उलटतपासाच्या कसोटीवर परखुन निघाल्या शिवाय असा तोंडी पुरावा ग्राह्य धरता येत नाही, ही कायद्यास सर्वमान्य अशी असलेली वस्तुस्थिती आहे. जर प्रतिवादी क्र.११ हे उलटतपासास हजर राहीले असते तर 'त्यांचा पुरावा बंद करणेचा किंवा खारीज

करणेचा’ प्रश्नच उपस्थित झाला नसता. याचा विचार करता प्रतिवादी क्र.११ यांचा पुरावा दिनांक १४/०३/२०२४ रोजीच्या आदेशा प्रमाणे खारीज करणे हेच न्यायोचित होणारे आहे. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| **०१.** | निशाणी ३३८ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| **०२.** | प्रतिवादी क्र.११ यांनी प्रतिवादी क्र.०३ ते ०७ साठी आणी स्वत:साठी निशाणी क्र.२३१ येथे दिलेला पुरावा, खारीज करणेत येतो. |

KIRAN RAJARAM KHONDRE

Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2026.03.05 10:57:12 +0530

**कऱ्हाड.**
दिनांक:०४ मार्च २०२६.

(किरण खोंद्रे)
०३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर.
कऱ्हाड, जि. सातारा.